राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

कालमर्यादा – १३/०१/२०२१

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/जेसू/२०२१/ 1055

दि.: 26 FEB 2021

प्रति,
प्राचार्य/ संचालक,
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये

**विषय- महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा गट अ या संवर्गातील सहाय्यक प्राध्यापक, अभियांत्रिकी महाविद्यालये या पदावर कार्यरत अध्यापकांच्या ज्येष्ठतासूचीबाबत...**

संदर्भ- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/ ज्येष्ठतासूची/२०२१/१०८ दिनांक १७/०२/२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांच्या पत्राचे अवलोकन करुन आपल्या संस्थेतील सहाय्यक प्राध्यापक पदावर दि.३१/१२/२०२० पर्यंत कार्यरत अध्यापकांची अचूक माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये भरुन **दिनांक १०/०३/२०२१ पुर्वी** व्दिप्रतीत या कार्यालयांस सादर करावी.

माहिती तयार करतांना ती Sakal Marathi font – New Microsoft Excel Worksheet आणि विवरणपत्राखालील दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करुन तयार करावी. तसेच माहितीची Softcopy est.ropune@gmail.com व desk4@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर पाठवावी.

(डॉ.दत्तात्रय व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२- ६८५९७४७३,४०४
ई-मेल-desk4@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ४/आस्था/ज्येष्ठतासूची/२०२१/९०८ दिनांक : 17 FEB 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई / पुणे /नाशिक /औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

विषय : महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा गट अ या संवर्गातील सहाय्यक प्राध्यापक, अभियांत्रिकी महाविद्यालये या पदावर कार्यरत अध्यापकांच्या ज्येष्ठतासूचीबाबत..
संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही २०११/प्र.क्र.२८४/१२, दि. २१/१०/२०११

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासकीय सेवेतील अधिकारी /कर्मचारी यांची ज्येष्ठतासूची तयार करणे व प्रसिध्द करणे याबाबतचे सर्वकष धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयातील अनु.क्र.३ मध्ये ज्येष्ठतासूची तयार करणे व प्रसिध्द करणे या संदर्भात करावयाची कार्यवाही विषद केलेली आहे. तसेच उपरोक्त शासन निर्णयातील निर्देशांचे पालन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठता विनियम) निम १९८२ मधील तरतुदीनुसार, ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी १ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून प्रसिध्द करण्याची व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले आहे.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सहाय्यक प्राध्यापक पदावर दि. ३१/१२/२०२० पर्यत कार्यरत अध्यापकांची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्र अ मध्ये भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह दि.१५/३/२०२१ पर्यत संचालनालयास सादर करावी. तसेच सदर माहितीची सॉफ्ट कॉपी कार्यासन क्र.४ ला ई-मेलद्वारे सादर करावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
25 FEB 2021
९८९६०

( प्रमोद नाईक )
सहसंचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई

प्रत : आस्थापना अधिकारी तथा कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सादर.

विवरणपत्र अ

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अध्यापकाचे नांव | विद्याशाखा | प्रवर्ग (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने /मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष) | ज्येष्ठता दिनांक /ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

- माहिती तयार करताना **Sakal Marathi** या **Font** चा वापर करावा अन्य कोणत्याही **Font** मध्ये माहिती पाठवू नये व माहिती Excell Sheet मध्ये सादर करावी.
- एका अध्यापकाच्या माहितीसाठी एकच ओळ वापरावी. **Multipal Lines** मध्ये माहिती देऊ नये **Alt + Enter** चा वापर करावा.
- अध्यापकाचे संपूर्ण नांव देण्यात यावे. ( उदा : मंगेश मनोहर खडसे )
- तारीख नमूद करताना **DD-MM-YY** या **Format** मध्ये नमूद करावी. तारीख नमूद करताना - शिवाय इतर कोणतेही चिन्ह (/ , . ) वापरु नये.